**<u>अति-तातडीचे/ई-मेलद्वारे:</u>**
दूरध्वनी क्र. ०२२-२२०१४४५९
Email: anandrao.warkade@nic.in

महाराष्ट्र शासन

क्रमांक:डोळीप २०१६/प्र.क्र.१२५/परा-१
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.
दिनांक:४ जानेवारी, २०१७.

प्रति,

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदा.

रत्नागिरी जिल्हा परिषद
विभाग/शाखा- आवक क्र
परिषद
21 JAN 2017
उप.मु.का.अ./अति मु.ले.अ./मु.ले.व.अ.
79

सर्व विभागांना [illegible] वेबसाईट प्रसिद्ध करावे.

विषय:-शासकीय / निमशासकीय कार्यालयात / विभागीय / जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय शासन संचालीत सर्व शिक्षण संस्था यामध्ये कोणत्याही धर्माच्या धार्मिक तिथी, सण उत्सव इत्यादिबाबत/ कार्यालयीन इमारतीच्या भिंतीवर धार्मिक घोष वाक्य लिहीणे/ धार्मिक फोटो लावणे: भारतीय संविधानानुसार निषिद्ध व चुकीचे आहे, हे बंद करुन धार्मिक फोटो कार्यालयातून सन्मानाने काढून घेण्याबाबत.

संदर्भ:-१)महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, पुणे यांचे पत्र क्र.कास्ट्राईब/निवेदन/९६/३०२, दि.९/९/२०१६.
२) या विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक:संकीर्ण-१०/प्र.क्र.१३४/२००२/परा-१, दिनांक ७ जून,२००२.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन विषयासंदर्भातचे पत्र सुलभ संदर्भासाठी सोबत जोडले आहे.

२. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने असे कळविण्यात येते की, भारतीय घटनेच्या मुलभूत तत्वानुसार शासकीय / निमशासकीय कार्यालयात / विभागीय / जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय शासन संचालीत सर्व शिक्षण संस्था यामध्ये कोणत्याही धर्माच्या धार्मिक तिथी, सण,उत्सव इमारतीच्या भिंतीवर धार्मिक घोष वाक्य लिहीणे, धार्मिक फोटो लावणे हे भारतीय संविधानानुसार निषिद्ध व चुकीचे आहे. सबब, धार्मिक फोटो शासकीय कार्यालयातील इमारतीच्या भिंतीवर धार्मिक घोष वाक्य लिहीणे हे सर्व बंद करण्यात येऊन धार्मिक फोटो शासकीय कार्यालयातून सन्मानाने काढून घेण्याबाबत आपल्या अधिनस्त सर्व संबंधित कार्यालयांना त्वरित कळविण्यात यावे/ तसेच आपल्या अखत्यारीतील सर्व अधिनस्थ कार्यालयांना भारतीय संविधानाच्या मुलभूत तत्वांचे काटेकोर पालन करण्याकरिता त्वरित आदेश देण्यात यावेत, ही विनंती. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास तात्काळ अहवाल सादर करण्यात यावा.

आपला,

(आ. वि. वरकडे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत- १)मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई-३२ यांना माहितीस्तव.
२)अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, पुणे यांचे पत्र क्र.कास्ट्राईब/निवेदन/९६/३०२, दि.९/९/२०१६ च्या संदर्भात माहितीस्तव सादर.

C:\परव\परा-१\पत्र- शासकीय - निमशासकीय कार्यालय (परव) .docx.docx

Scanned by CamScanner